दिनांक ०३ / ११ /२०२१

**-: मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती २०१९ :-**

**-: अंतरिम निवड यादीत समावेश झालेल्या उमेदवारांच्या वैद्यकीय चाचणीबाबत सूचना :-**

- अंतरिम निवड यादीत समावेश झालेल्या पुरूष उमेदवारांची वैद्यकीय चाचणी दिनांक ०९/११/२०२१ व दिनांक १०/११/२०२१ रोजी आणि महिला उमेदवारांची वैद्यकीय चाचणी दि.११/११/२०२१ रोजी पोलीस शल्य चिकित्सक, नागपाडा पोलीस रूग्णालय, भायखळा, मुंबई-८ येथे करण्यात येईल. उमेदवाराना वैद्यकीय चाचणी प्रवेशपत्र https://mhpolicebharti.cbtexam.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहे. त्यात नमुद दिवशी सकाळी ८.०० वा. न चुकता वैद्यकीय चाचणीसाठी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.
- वैद्यकीय तपासणी 'महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१, व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र , मुंबई यांच्या वेळोवेळीच्या आदेशांनुसार करण्यात येईल.
- वैद्यकीय चाचणीत १) दृष्टीदोष २) तिरळेपणा ३) रातआंधळेपणा ४) वर्णांधतेपणा ५) गुडघ्यास गुडघा लागणे ६) सपाट तळवे ७) त्वचा रोग ८) छातीचे रोग ९) तोतरेपणा या चाचण्यांचा समावेश असून या चाचण्यांमध्ये दोष आढळल्यास उमेदवारास अपात्र ठरवून त्याची निवड रद्द करण्यात येईल.
- उमेदवाराने वैद्यकीय चाचणीच्या दिनांकास व वेळेस न चुकता उपस्थित राहणे आवश्यक आहे. **उमेदवार वैद्यकीय चाचणीसाठी अनुपस्थित राहिल्यास कोणतीही सूचना न देता त्याची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल. त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहिल.**
- वैद्यकीय चाचणीसाठी येताना प्रवेशपत्र नसल्यास, वैद्यकीय चाचणीसाठी प्रवेश दिला जाणार नाही.
- वैद्यकीय चाचणीस येताना अलीकडील कालावधीतील **चार पासपोर्ट आकाराचे फोटो** व **सर्व मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे** न चुकता सोबत आणावीत.
- वैद्यकीय चाचणीत 'तात्पुरते अपात्र' ठरविण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस शल्यचिकित्सक यांच्या शिफारशीनुसार सर जे.जे. समूह रूग्णालयातील संबधीत वैद्यकीय मंडळाकडे/विभागाकडे पुढील तपासणीसाठी पाठविण्यात येईल.
- वैद्यकीय चाचणीसाठी उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. त्यासाठी उमेदवारास कोणताही प्रवास खर्च दिला जाणार नाही.
- वैद्यकीय चाचणीच्या वेळी उमेदवाराने कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारांचा अवलंब केल्यास त्यांना अपात्र ठरवून त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
- नियुक्ती प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय उमेदवारास बंधनकारक राहील.
- पोलीस शिपाई (चालक) भरती प्रक्रियेअंतर्गत वैद्यकिय चाचणी अथवा पुढील प्रक्रियेसंदर्भात कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची मागणी केल्यास उमेदवाराने त्याबाबतची माहिती अॅन्टी करप्शन ब्युरो, मुंबई यांना ०२२-२४९९२०५० व (हेल्पलाईन नंबर) १०६२ या क्रमांकावर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी.
- वैद्यकिय चाचणी अथवा पुढील प्रक्रियेत गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास आल्यास, उमेदवार सदर बाब संबंधित पोलीस अधिकाऱ्यांच्या / वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देवू शकतील.
- पोलीस भरतीबाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे उमेदवाराने काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

(योगेश कुमार)
सदस्य, मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती २०१९ समिती,
तथा पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय-२), मुंबई.